मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# मालमत्ता कर भरताना 10 टक्के सवलत घेण्याची शेवटची संधी..!

## 1 जुलैपासून थकबाकीदारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू करण्यात येणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभागामार्फत मालमत्ता करावर जाहीर करण्यात आलेल्या विविध सवलत योजनांचा लाभ घेण्यासाठी ३० जून २०२६ ही शेवटची मुदत आहे. आर्थिक वर्ष २०२६-२७ चा मालमत्ता कर ३० जून २०२६ पर्यंत ऑनलाईन भरणाऱ्या मालमत्ताधारकांना सामान्य करावर १० टक्के सवलत देण्यात येत आहे. ३० जूननंतर या सवलत योजनेचा लाभ घेता येणार नाही. तर १ जुलै २०२६ पासून मालमत्ता कर थकबाकीदारांवर कारवाई करण्याची मोहीम सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे नागरिकांनी अंतिम मुदतीपूर्वीच मालमत्ता कराचा भरणा करून १० टक्के सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे



महापालिका हद्दीत सध्या ७ लाख ४४ हजारांहून अधिक मालमत्ताधारक आहेत. त्यापैकी आतापर्यंत ४ लाख १५ हजारांहून अधिक मालमत्ताधारकांनी ४८३ कोटींहून अधिक मालमत्ता कर भरला आहे. यामध्ये जवळपास ३ लाख ४६ हजार मालमत्ताधारकांनी ऑनलाईन पद्धतीने कर भरून १० टक्के सवलत योजनेचा लाभ घेतला आहे. या सवलत योजनेला शहरातील नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, उर्वरित मालमत्ताधारकांनीही ३० जूनपूर्वी कर भरून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कर संकलन विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांनी केले आहे.

तसेच, १ जुलैपासून मालमत्ता कर वसुली मोहिमेला अधिक व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे. थकीत मालमत्ता कर वसूल करण्यासाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून, वारंवार आवाहन करूनही तसेच जप्तीच्या नोटिसा बजावूनही कर न भरणाऱ्या थकबाकीदारांविरुद्ध जप्तीची कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी सर्व विभागीय कार्यालयांना आवश्यक सूचना देण्यात आल्या असून, मोठ्या थकबाकीदारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

> **पिंपरी चिंचवड शहराचा सर्वांगीण विकास हा आपल्या सर्वांच्या सहभागातूनच शक्य आहे. नागरिकांनी भरलेला प्रत्येक रुपया शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता आणि विविध विकासकामांमध्ये खर्च केला जातो. त्यामुळे ३० जून २०२६ पर्यंत उपलब्ध असलेल्या मालमत्ता कर सवलतीच्या प्रत्येक मालमत्ताधारकाने लाभ घ्यावा.**
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> **महापालिकेच्या उत्पन्नातील प्रत्येक रुपया हा नागरिकांच्या सुविधांमध्ये आणि शहराच्या विकासकामांमध्ये गुंतवला जातो. त्यामुळे मालमत्ता कराची वेळेत वसुली ही महापालिकेच्या आर्थिक नियोजनासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. नागरिकांना अधिक लाभ मिळावा म्हणून ३० जून २०२६ पर्यंत १० टक्के सवलत ऑनलाईन कर भरणाऱ्यांना देण्यात आली आहे. या अंतिम संधीचा लाभ घेत नागरिकांनी कराचा भरणा करावा. यानंतर महसूल वसुलीच्या नियोजनानुसार विशेष मोहीम राबविण्यात येईल.**
> - डॉ. विजय सुर्यवंशी, आयुक्त , पिंपरी चिंचवड महानगरपालिका

# कॉल फॉरवर्डिंगद्वारे सायबर फसवणूक वाढली: नागरिकांना पोलिसांचा इशारा

## मोबाईलवर येणारे बनावट संदेश व कोड डायल करून होणाऱ्या फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी केले आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

'तुमचे सिम कार्ड बंद होणार आहे', 'केवायसी अपडेट करा', 'नेटवर्क व्हेरिफिकेशनसाठी *# कोड डायल करा', अशा प्रकारचे फोन किंवा संदेश आल्यास सावध राहण्याचे आवाहन पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी केले आहे. सायबर गुन्हेगार आता कॉल फॉरवर्डिंग (CALL FORWARDING) या सुविधेचा गैरवापर करून नागरिकांच्या मोबाईलवरील महत्त्वाचे कॉल स्वतःच्या मोबाईलवर वळवत आर्थिक



फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे.

सायबर गुन्हेगार स्वतःला मोबाईल कंपनीचा अधिकारी असल्याचे सांगतात. त्यानंतर सिम कार्ड बंद होणार, केवायसी अपूर्ण आहे, नेटवर्क अपडेट करावे लागेल किंवा व्हेरिफिकेशन आवश्यक आहे, अशी भीती दाखवून नागरिकांना * किंवा # असलेला USSD कोड डायल करण्यास भाग पाडले जाते. हा कोड डायल होताच संबंधित मोबाईलवरील कॉल फॉरवर्डिंग सुविधा सुरू होते आणि नागरिकांना येणारे महत्त्वाचे कॉल थेट सायबर गुन्हेगारांकडे वळविले जातात. यानंतर बँक, यूपीआय, क्रेडिट कार्ड तसेच इतर आर्थिक व्यवहारांशी संबंधित व्हेरिफिकेशन कॉल किंवा ओटीपी कॉल गुन्हेगारांकडे पोहोचतात. या माहितीचा गैरवापर करून ते बँक खात्यातील रक्कम लंपास करतात.

> **कॉल फॉरवर्डिंगच्या माध्यमातून होणाऱ्या सायबर फसवणुकीपासून बचावासाठी नागरिकांनी अनोळखी व्यक्तीच्या सांगण्यावरून कोणताही USSD कोड डायल करू नये. संशयास्पद कॉल किंवा फसवणुकीचा प्रकार निदर्शनास आल्यास तातडीने १९३० या हेल्पलाईनवर अथवा राष्ट्रीय सायबर गुन्हे पोर्टलवर तक्रार नोंदवावी. नागरिकांची सतर्कताच अशा गुन्ह्यांवरील प्रभावी प्रतिबंध आहे.**
> - रविकिरण नाळे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सायबर पोलिस ठाणे, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाची मागणी

## आमदार महेश लांडगे यांचा सभागृहात औचित्याचा मुद्दा, 32 लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे ३२ लाख नागरिकांच्या अन्नसुरक्षेचा प्रश्न विधानसभेत चर्चेत आला. भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी आज विधानसभेत औचित्याचा मुद्दा उपस्थित करत पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय (PUBLIC DISTRIBUTION SYSTEM – PDS) स्थापन करण्याची तसेच शहराच्या वाढत्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक (QUOTA) मंजूर करण्याची जोरदार मागणी केली आहे.

मुंबई येथील विधानभवन येथे पावसाळी अधिवेशन सुरू आहे. यावेळी आमदार लांडगे यांनी राज्य सरकारचे लक्ष वेधले. ते म्हणाले की, पिंपरी-चिंचवड हे राज्यातील सर्वाधिक वेगाने विकसित होणारे औद्योगिक आणि नागरी शहर असून, मोठ्या प्रमाणावर स्थलांतरित कामगार व वाढत्या लोकसंख्येमुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील ताण दिवसेंदिवस वाढत आहे.




### स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाची गरज

**» पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या ३२ लाखांच्या पुढे गेली असून शहराचा विस्तारही झपाट्याने होत आहे. मात्र, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे (PDS) सर्व प्रशासकीय कामकाज अद्याप पुणे कार्यालयातूनच चालविले जाते. त्यामुळे शिधापत्रिकांमध्ये नाव समाविष्ट करणे, दुरुस्ती, नवीन लाभार्थी नोंदणी, तक्रार निवारण आणि अन्नधान्य वितरणात विलंब होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरासाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय आणि लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामुळे लाभार्थ्यांना जलद, पारदर्शक आणि प्रभावी सेवा मिळण्यास मदत होईल.**

मात्र, शहरातील संपूर्ण अन्नधान्य वितरणाचे नियोजन आणि प्रशासकीय कामकाज आजही पुणे शहरातील कार्यालयामार्फत केले जात असल्याने नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अन्नधान्याचे वेळेवर वितरण, नवीन लाभार्थ्यांची नोंदणी, शिधापत्रिकांमधील दुरुस्ती, नाव समाविष्ट करणे किंवा वगळणे, तक्रार निवारण, इष्टांक वाटप यासह विविध प्रशासकीय कामांमध्ये मोठा विलंब होत असून, त्याचा फटका पात्र व गरजू लाभार्थ्यांना बसत आहे. आमदार लांडगे यांनी सरकारकडे पिंपरी-चिंचवडसाठी स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालयाला प्रशासकीय मान्यता देण्याबरोबरच आवश्यक पदनिर्मिती करण्याची मागणी केली. तसेच शहराच्या लोकसंख्येनुसार स्वतंत्र अन्नधान्य इष्टांक मंजूर करून राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजना व सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.

यासोबतच ई-राशन कार्ड, ऑनलाइन सेवा, लाभार्थी पडताळणी, डिजिटल निरीक्षण प्रणाली आणि वितरण व्यवस्थेवर स्थानिक स्तरावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र कार्यालय अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. आमदार लांडगे यांनी हा विषय लाखो नागरिकांच्या अन्नसुरक्षेशी, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी आणि जनहिताशी संबंधित असल्याने शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, अशी ठाम मागणी केली.

> **“पिंपरी-चिंचवडची लोकसंख्या, औद्योगिक विस्तार आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील वाढता ताण लक्षात घेता स्वतंत्र अन्नधान्य वितरण कार्यालय ही काळाची गरज आहे. स्थानिक पातळीवर सक्षम यंत्रणा उभी राहिल्यास लाभार्थ्यांना वेळेवर सेवा मिळेल, वितरण व्यवस्थेत पारदर्शकता वाढेल आणि लाखो नागरिकांची अन्नसुरक्षा अधिक प्रभावीपणे सुनिश्चित होईल. शासनाने याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी राज्य सरकारकडे केली आहे.**
>
> **- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.**

# मोशी आरटीओ परिसरात बेशिस्त पार्किंगचा विळखा; नागरिक त्रस्त

## आरटीओ कार्यालयाबाहेर वाहनांची बेकायदेशीर पार्किंग वाढल्याने वाहतूक कोंडी; रहिवाशांकडून तातडीच्या उपाययोजनेची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी प्राधिकरणातील उपप्रादेशिक परिवहन (आरटीओ) कार्यालयाबाहेर दररोज येणाऱ्या वाहनांच्या बेशिस्त पार्किंगमुळे परिसराला अनधिकृत पार्किंगचा विळखा पडला आहे. यामुळे परिसरातील नागरिकांना सतत वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे.

आरटीओ कार्यालयात विविध कामांनिमित्त येणारे नागरिक आपली वाहने रस्त्यावर आणि आजूबाजूला कशीही उभी करून निघून जातात. या कार्यालयाच्या बाजूलाच मोठ्या रहिवासी सोसायट्या आहेत. या सोसायट्यांच्या प्रवेशद्वारासमोर आणि संरक्षक भिंतींना लागूनच दिवसभर गाड्या उभ्या केल्या जात असल्याने, येथील रहिवाशांना आपल्या स्वतःच्या सोसायटीत ये-जा करतानाही विनाकारण त्रास सहन करावा लागत आहे



या समस्येबाबत स्थानिक नागरिकांनी आणि सोसायट्यांच्या पदाधिकाऱ्यांनी आरटीओ प्रशासन तसेच संबंधित विभागांकडे वारंवार तक्रारी केल्या आहेत, मात्र अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. आरटीओ कार्यालयासाठी स्वतंत्र व हक्काची जागा आरक्षित करण्यात आल्याच्या चर्चा गेल्या अनेक दिवसांपासून फक्त कागदावर आणि बैठकांमध्येच सुरू आहेत. मात्र, या चर्चांना प्रत्यक्ष कृतीची जोड मिळून कामाला गती येणे आता अत्यंत आवश्यक आहे.

शासकीय व अशासकीय कार्यालयांमध्ये कामानिमित्त येणारे नागरिक अनेकदा आपल्या वाहनांचे अत्यंत बेशिस्तपणे पार्किंग करतात. ही वस्तुस्थिती आहे. मात्र, या कार्यालयाच्या अगदी बाजूलाच रहिवासी परिसर असल्यामुळे नागरिकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे. दरम्यान, चिखली येथे स्थलांतर झाल्यानंतर कार्यालयाच्या मागील बाजूस असलेल्या ब्रेक टेस्ट ट्रॅकच्या रिकाम्या जागेत दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या पार्किंगसाठी सुयोग्य आखणी केली जाईल. नागरिकांना आपली वाहने रस्त्यावर लावण्याऐवजी या निश्चित केलेल्या जागेत पार्क करण्याचे आवाहन केले जाईल, ज्यामुळे या भागातील वाहतूककोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

> **आरटीओ कार्यालयाच्या आवारात आणि परिसरात होणारी गर्दी लक्षात घेता, येत्या १ जुलैपासून मोठ्या वाहनांचे (कमर्शियल गाड्या) फिटनेस तपासणीचे काम चिखली येथील नवनिर्मित वाहन तपासणी केंद्रात टप्प्याटप्प्याने स्थलांतरित करण्यात येणार आहे. सध्या तेथील पोहोच रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून, सुरुवातीला तात्पुरत्या स्वरूपात काही गाड्यांची तपासणी तेथे केली जाईल. पुढील दोन महिन्यांत हे काम पूर्ण क्षमतेने चिखलीत सुरू होईल, ज्यामुळे आरटीओ परिसरातील मोठ्या गाड्यांचा प्रश्न पूर्णपणे सुटणार आहे.**
>
> **- राहुल जाधव, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मोशी**

# बांधकामासाठी पिण्याचे पाणी वापरल्यास थेट 'काम बंद' आणि दंडात्मक कारवाई!

## पाणी वाचवण्यासाठी पुणे महानगरपालिकेने अत्यंत कठोर निर्णय घेतला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहरामध्ये सद्यस्थितीत तीव्र पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून, पाण्याचा थेंबन् थेंब वाचवण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत. असे असतानाही, शहरातील काही भागांमध्ये बांधकाम प्रकल्पांसाठी सर्रासपणे पिण्याच्या पाण्याचा वापर केला जात असल्याचे समोर आले आहे.

या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका प्रशासनाने आता अत्यंत कठोर पाऊल उचलले आहे. बांधकाम प्रकल्पांवर पिण्याच्या पाण्याचा बेकायदेशीर वापर होत असल्याचे आढळल्यास, संबंधित बांधकाम तात्काळ बंद करून दंडात्मक कारवाई केली जाणार आहे. तपासणीसाठी महापालिकेने विशेष पथके नेमण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती पुणे महापालिकेचे शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर यांनी दिली.

शहरात पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन व्हावे आणि पाणीटंचाईची तीव्रता कमी व्हावी, यासाठी महापालिकेने बांधकाम व्यावसायिकांना पिण्याच्या पाण्याचा वापर न करण्याचे आवाहन केले होते. मात्र, अनेक भागांत या आवाहनाकडे स्पष्ट दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष करावा लागत असताना दुसरीकडे बांधकाम प्रकल्पांवर पिण्याचे पाणी वापरले जात असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. ही बाब गांभीर्याने घेत प्रशासनाने आता आपली तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे.

या मोहिमेअंतर्गत शहरातील बांधकाम प्रकल्पांची कडक तपासणी करण्यासाठी महापालिकेने विशेष पथके तयार केली आहेत. यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागातील उपअभियंते आणि कनिष्ठ अभियंत्यांवर ही महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. प्रत्येक अधिकाऱ्याला त्यांच्या वॉर्ड मधील बांधकामांची नियमितपणे आणि अचानक भेट देऊन पाहणी करण्याचे कडक आदेश देण्यात आले आहेत.



### पर्यायी पाण्याचा वापर बंधनकारक

» बांधकाम प्रकल्पांसाठी महापालिकेचे पिण्याचे पाणी वापरण्यास स्पष्ट मनाई करण्यात आली आहे. त्याऐवजी प्रक्रिया केलेले सांडपाणी (Recycled Water) किंवा अन्य पर्यायी जलस्रोतांचा वापर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरातील पिण्याच्या पाण्याचा साठा नागरिकांसाठी राखून ठेवणे आणि वाढती पाणीटंचाई कमी करणे हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे. पर्यावरणपूरक आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला चालना देतानाच बांधकाम क्षेत्रातही जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा महापालिकेचा प्रयत्न आहे.

### विशेष तपासणी पथके सज्ज

» महापालिकेने शहरातील बांधकाम प्रकल्पांची तपासणी करण्यासाठी विशेष पथके स्थापन केली आहेत. बांधकाम विभागातील उपअभियंते आणि कनिष्ठ अभियंत्यांवर ही जबाबदारी सोपविण्यात आली असून, प्रत्येक अधिकाऱ्याला त्यांच्या कार्यक्षेत्रातील बांधकामांची नियमित तसेच अचानक पाहणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तपासणीदरम्यान पिण्याच्या पाण्याचा वापर होत असल्याचे आढळल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित बांधकामाला 'काम बंद' नोटीस देण्यात येणार आहे. त्यानंतर संबंधित बांधकाम व्यावसायिकावर दंडात्मक आणि प्रशासकीय कारवाई करून नियमांची कठोर अंमलबजावणी केली जाणार आहे.

### पाणीटंचाईत नागरिकांना दिलासा

» शहरात अनेक भागांत दिवसाआड पाणीपुरवठा होत असताना नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. अशा परिस्थितीत बांधकामांसाठी पिण्याच्या पाण्याचा होणारा गैरवापर रोखणे ही काळाची गरज बनली आहे. महापालिकेच्या कठोर कारवाईमुळे पाण्याचा अपव्यय कमी होण्यास मदत होणार असून उपलब्ध पाण्याचा वापर अधिक नियोजनबद्ध पद्धतीने करता येणार आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना पिण्याच्या पाण्याचा अधिक न्याय्य आणि सुरक्षित पुरवठा करण्यासाठी प्रशासनाला बळ मिळणार आहे.

# लोककलावंतांचा संताप; 'पद्मश्री परत करू' असा इशारा

## मुख्यमंत्री व सांस्कृतिक मंत्र्यांच्या अनुपस्थितीमुळे समरसता लोककला संमेलनात नाराजी व्यक्त करत ज्येष्ठ कलावंतांनी सरकारवर गंभीर टीका केली

**पुणे | प्रतिनिधी**

गावकुसाबाहेर असल्याप्रमाणे आजही लोककलावंतांच्या पदरी उपेक्षितांचे जगणे आहे. समरसता लोककला संमेलनाच्या माध्यमातून लोककलावंतांच्या अडचणी आम्हाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांना सांगायचे होते. मात्र, त्यांच्या अनुपस्थितीने निराशा झाली, मुख्यमंत्री आणि सांस्कृतिक मंत्र्यांनी वेळ द्यायला हवा. लोककलावंतांच्या प्रश्नांसाठी त्यांनी वेळ दिला नाही तर प्रसंगी 'पद्मश्री' परत करू, असा इशारा पहिल्या समरसता लोककला संमेलनाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ लोककलावंत रघुवीर खेडकर यांनी अध्यक्षीय भाषणात दिला.

राज्याचा सांस्कृतिक कार्य विभाग, सांस्कृतिक कार्य संचालनालय आणि समरसता साहित्य परिषद यांच्या वतीने आयोजित या समरसता लोककला संमेलनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार होते. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित राहणार होते. मात्र, ते येऊ शकले नाहीत, याबद्दल खेडकर यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

उद्घाटनाच्या सत्रात फोक प्रबोधनच्या युवा वादकांनी सादर केलेल्या पारंपरिक वाद्यांच्या जोशपूर्ण वादनाने संमेलनात चैतन्य निर्माण केले. शांती ब्रह्म गुरुकुलच्या वादकांनी पारंपरिक वारकरी पद्धतीने मृदंगवादन केले. उद्घाटनापूर्वी कलावंत दिंडी काढण्यात आली. तसेच, बालगंधर्व कलादालनात विविध लोककला वाद्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. अनिल मोरे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या जान्हवी जानकर, विश्वनाथ गराडकर, संमेलनाचे स्वागताध्यक्ष धीरज घाटे, धनंजय खुडे, नीलेश गद्रे, डॉ. प्रसन्न पाटील, शाहीर हेमंत मावळे हेही उपस्थित होते.



### लोककलावंत अद्याप उपेक्षित

» समाजात समरसता वृद्धिंगत करण्याच्या कामात लोककलावंतांचा सहभाग वाढावा या उद्देशाने समरसता लोककला संमेलन आयोजित करण्याचा उपक्रम उल्लेखनीय असला तरी प्रत्यक्षात लोककलावंत अद्याप उपेक्षितांचे जगणे जगत आहेत. त्यांची आबाळ दूर करण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे गरजेचे आहे, अशी मागणी रघुवीर खेडकर यांनी केली. लोककलावंतांचे जगणे अजूनही आव्हानात्मक स्वरूपाचे आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले.

# पुणे ग्रामीण पोलिसांसमोर मोठं आव्हान!

## तीन वर्षांतील मृत्यूंचे आकडे चिंताजनक; पायाभूत सुविधांमधील सुधारणांसह ग्रामीण भागात व्यापक रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील प्रत्येक पोलीस विभागाला रस्ता अपघातांमध्ये १० टक्के घट करण्याचे उद्दिष्ट दरवर्षी दिले जाते. राज्यात सर्वाधिक रस्ते मृत्यूंची नोंद पुणे ग्रामीण पोलीस हद्दीत झाल्याने सरकारने त्यांना तब्बल १५ टक्के अपघात कमी करण्याचे विशेष लक्ष्य दिले आहे. हे आव्हान स्वीकारत अपघातप्रवण ठिकाणांवर विशेष उपाययोजना राबविण्यात येणार असल्याची माहिती पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल यांनी दिली.

पुणे ग्रामीण पोलीस हद्दीतून पुणे-अहमदनगर, पुणे-सोलापूर, पुणे-सातारा, पुणे-नाशिक, पुणे-महाड, नगर-कल्याण या राष्ट्रीय व राज्य महामार्गांसह अनेक प्रमुख मार्ग जातात. तसेच पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गाचा काही भागही यात येतो. त्यामुळे या मार्गांवर सातत्याने गंभीर व जीवघेणे अपघात घडतात. पुणे ग्रामीणमध्ये अपघातांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या चिंताजनक आहे. २०२२ मध्ये ९४७, २०२३ मध्ये १,०९३, तर २०२४ मध्ये ९६७ जणांचा मृत्यू झाला. ही संख्या महाराष्ट्रातील इतर कोणत्याही पोलीस घटकापेक्षा अधिक असल्याने पुणे ग्रामीणला वेगळे लक्ष्य दिले आहे.

अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी ग्रामीण पोलिसांनी सार्वजनिक बांधकाम, महसूल आणि अन्य संबंधित शासकीय यंत्रणांच्या समन्वयाने तीन संयुक्त समित्या स्थापन केल्या आहेत. या समित्या अपघातग्रस्त ब्लॅक स्पॉटची प्रत्यक्ष पाहणी करून चालकांची दृश्यमानता वाढविणे, रस्त्यांवरील त्रुटी दूर करणे आणि आवश्यक पायाभूत सुधारणासाठी उपाययोजना सुचविणार आहेत.

महामार्गावरील दुभाजकांमध्ये नागरिकांनी तयार केलेले बेकायदा कट (पंक्चर) अपघातांचे प्रमुख कारण आहेत. हे सर्व बेकायदा मार्ग बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होतील. पायाभूत सुविधांतील सुधारणा करण्याबरोबरच ग्रामीण भागात व्यापक रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच राष्ट्रीय व राज्य महामार्गांवर मोठ्या प्रमाणात धावणाऱ्या अवजड वाहनांच्या हालचालींवर विशेष लक्ष ठेवून नियमभंग करणाऱ्यांवर कार/वाई केली जाणार आहे.




### जनजागृतीलाही प्राधान्य

» महामार्गांच्या दुभाजकांमध्ये नागरिकांनी तयार केलेले बेकायदा कट अनेक भीषण अपघातांना कारणीभूत ठरत असल्याने ते टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय पुणे ग्रामीण पोलिसांनी घेतला आहे. यासोबतच ग्रामीण भागात रस्ता सुरक्षा जनजागृती अभियान राबवून वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत नागरिकांना जागरूक केले जाणार आहे. राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवर धावणाऱ्या अवजड वाहनांवर विशेष नजर ठेवून वेगमर्यादा, ओव्हरलोडिंग आणि अन्य नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. सुरक्षित वाहतूक संस्कृती निर्माण करण्यावर या मोहिमेचा भर असणार आहे.

### ब्लॅक स्पॉटवर विशेष उपाययोजना

» पुणे ग्रामीण पोलीस, सार्वजनिक बांधकाम विभाग, महसूल विभाग आणि इतर संबंधित यंत्रणांच्या संयुक्त समित्या अपघातप्रवण (ब्लॅक स्पॉट) ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. या पाहणीनंतर रस्त्यांवरील त्रुटी दूर करणे, आवश्यक दिशादर्शक फलक, प्रकाशयोजना, संरक्षक कठडे आणि इतर सुरक्षाविषयक सुविधा उभारण्याच्या शिफारशी करण्यात येणार आहेत. चालकांची दृश्यमानता वाढवून आणि धोकादायक वळणांवर सुधारणा करून गंभीर अपघातांचे प्रमाण कमी करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या उपाययोजनांमुळे राष्ट्रीय व राज्य महामार्गांवरील प्रवास अधिक सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

> "रस्ते अपघातांमधील मृत्यू कमी करण्याचे आव्हान आम्ही स्वीकारले आहे. सर्व विभागांच्या समन्वयातून पायाभूत सुविधा सुधारणा, ब्लॅक स्पॉट दुरुस्ती, बेकायदा कट बंद करणे आणि जनजागृती अशा सर्वसमावेशक उपाययोजनांवर भर दिला जाणार आहे."
>
> - संदीपसिंह गिल्ल पोलीस अधिक्षक,पुणे जिल्हा

# पुण्याच्या 600 गावांचा चेहरा बदलणार; मास्टर प्लॅन तयार

## पुढील 25 वर्षांचे आव्हानात्मक नियोजन! वाहतूक कोंडी, पर्यावरण ऱ्हास आणि पाणीटंचाईवर तोडगा काढण्यासाठी उच्चशिक्षित तज्ज्ञांची फौज मैदानात.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) मागील प्रारुप विकास आराखड्यात (डीपी) झालेल्या मोठ्या गोंधळामुळे प्राधिकरणाला तो डीपी रद्द करावा लागला होता. या पार्श्वभूमीवर, मागील चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी आणि पीएमआरडीए हद्दीतील ६०० गावांचा पुढील २० ते २५ वर्षांचा सुनियोजित विकास करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे.

प्राधिकरणाने आता स्ट्रक्चर प्लॅन तयार करण्याचे काम हाती घेतले असून, यामध्ये वाहतूक कोंडी, निसर्गाचा ऱ्हास आणि वाढत्या नागरिकरणाच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी उच्चशिक्षित तज्ज्ञांचा सहभाग निश्चित केला आहे. स्ट्रक्चर प्लॅन तयार करताना भविष्यातील पुणे महानगरांसमोरील आव्हाने नजरेसमोर ठेऊन विभागनिहाय उद्दीष्टे निश्चित केली आहेत. ती खालील प्रमाण

डोंगर माथा आणि डोंगर उतार क्षेत्रांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करून त्यांचे वर्गीकरण व संरक्षण करणे. वाढत्या शहरीकरणाचा विचार करून घनकचरा व्यवस्थापन आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी योग्य जागा निश्चित करणे. जमिनीतील पाण्याची पातळी वाढवण्यासाठी आणि पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विशेष वॉटर रिचार्ज योजना व धोरणात्मक उपाय सुचवणे. नदी, नाले , तलाव, जंगले आणि संवेदनशील पर्यावरण क्षेत्रांचे नकाशे तपासून ते अचूक करणे. मोठ्या उद्यानांसाठी जागा सुचवणे.

पीएमआरडीएच्या रचनेला अनुकूल अशी संपूर्ण जीआयएस डेटा मॉडेल तयार करणे. सर्व प्रकारच्या भौगोलिक आणि सांख्यिकीय माहितीसाठी एक मुख्य डेटा बेस करणे. वाहतूक, भूवापर आणि पर्यावरणविषयक माहितीचे एकत्रीकरण करून नेटवर्क, सुलभता आणि योग्यतेचे प्रगत विश्लेषण करणे,.




### वाहतुकीचे नियोजन

» नव्याने विकसित होणारे भाग ओळखून, तेथे भविष्यात निर्माण होणाऱ्या वाहतुकीच्या गरजेनुसार दळणवळणाचे जाळे सुचवणे. मुख्य महामार्गाव्यतिरिक्त इतर आवश्यक रस्त्यांची पायाभूत रचना निश्चित करणे आणि भविष्यातील मागणीनुसार रस्त्यांचे योग्य पदानुक्रम ठरविले जातील. पुणेकरांसाठी भविष्यात लागणारे सार्वजनिक वाहतुकीची साधने आणि आवश्यक सुविधांबद्दल ठोस उपाययोजना सुचवणे. वाहतूक प्रकल्पांना प्राधान्यक्रम देणे, त्यांच्यासाठी लागणाऱ्या निधीचे नियोजन करणे आणि प्रकल्पांच्या देखरेखीसाठी यंत्रणा उभारणे आदीकडे पीएमआरडीए लक्ष देणार आहे.